# प्रकरण २ रे

## मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्त्व

२.१ ] मराठी भाषा - अर्थ, व्याप्ती आणि अभ्यासक्रमातील स्थान.

क] प्रस्तावना

ख] मराठी भाषा - अर्थ

ग] मराठी भाषेची व्याप्ती

१. मराठी भाषेचा इतिहास

२. मराठीच्या पोटभाषा व बोलीभाषा

३. मराठी भाषेचे लेखन

४. मराठी भाषेचा शब्दसंग्रह

घ] मराठी भाषेचे माध्यमिक शाळेतील स्थान.

१. मराठी भाषेचे महत्व

२. मराठी विषयाचा माध्यमिक शाळेतील
अध्यापनाचा अर्थ व स्वरूप.

३. मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील शिक्षण.

ङ] मराठी विषयाच्या अध्ययनाची तत्त्वे

२.२ ] मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे

क] माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाची
भाषिक उद्दिष्टे

ख] माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाची
वाङ्मयीन उद्दिष्टे.

२.३ ] समारोप

संदर्भ

# प्रकरण २ रे

## मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व महत्त्व.

### २.१ : मराठी भाषा - अर्थ, व्याप्ती आणि अभ्यासक्रमातील स्थान:-

क] प्रस्तावना:- भाषा हा मनुष्याचा अत्यंत महत्त्वाचा शोध आहे. ती अतिशय गुंतागुंतीची मानवी संस्था आहे. ती एकस्वरूपी नाही. तर अनेक प्रकारच्या विविधतेने नटलेली आहे. बोलली जाणे हे तिचे प्रमुख लक्षण होय. भष या धातूतून ते सुचविले जाते. पण ती लिहीलिही जाते. या दोन्ही स्वरूपात ती अभ्यसनीय आहे. भाषा ही संपर्कसाधनाचे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. भाषा ही माणसाने निर्माण केलेली महान शक्ती आहे. माणसाचे विचार त्याचे अनुभव व भावना परस्परांना व्यक्त करण्याचे भाषा हे एक महत्त्वाचे साधन आहे. भाषेच्या माध्यमातून माणूस परस्परांना समजून घेऊ शकतो.

ख] मराठी भाषा - अर्थ :- रा.सो. सराफ यांनी आपल्या 'भाषा, मातृभाषा व परभाषा' या ग्रंथात भाषेची व्याख्या दिली आहे.

> "भाषा म्हणजे सांकेतीक परंतु परंपरागत मौखिक प्रतिकांचा सामाजिक आंतर व्यवहाराकरिता उपयोगात येणारा आकृतिबंध होय." १

गं.ब. ग्रामोपध्ये यानीही भाषेचे यथार्थ वर्णन केलेले आहे.

> "केवळ साध्या व विपक्षितार्थरहित अशा नाद-लहरींपासून संपूर्ण व अर्थपूर्ण अशा-वाक्यरचनेपर्यंत चढत जाणा-या आकृतीबंधाच्या श्रेणी व त्या सा-यांची मिळून तयार झालेली - एकजीव[ Organic ] संघटना म्हणजे भाषा."

शारीरिक, मानसिक व भावनात्मक अशा अनेक शक्तींच्या संकलित परिणामातून भाषा निर्माण झाली.

## ग] मराठी भाषेची व्याप्ती:-

### १] मराठी भाषेचा इतिहास:-

मराठी भाषा ही भारतातील मुख्यत: महाराष्ट्र राज्यातील रहिवाशांची बोलीभाषा आहे. मराठी भाषेच्या पूर्वेला हिंदी व तेलगू भाषा, उत्तरेला गुजराती, हिंदी व राजस्थानी भाषा व दक्षिणेला कानडी भाषा बोलली जाते. भारतात भाषिकांच्या संख्येच्या मानाने मराठी भाषेचा क्रम हिंदी, तेलगू, बंगाली नंतर मराठी असा चौथा क्रम लागतो.

संस्कृत भाषा ही मराठी भाषेची जननी आहे. मराठी भाषा ही संस्कृतोद्भव भाषा आहे. मूळ संस्कृत भाषा भारतात पूर्वेकडे व दक्षिणेकडे पसरत गेली. एखादी भाषा पसरणे म्हणजे तिच्या भाषिकांनी नवनव्या प्रदेशावर आक्रमण करणे किंवा भाषिकांनी मूळ भाषा टाकून नवीन भाषेचा स्विकार करणे होय. संस्कृतच्या बाबतीत हे दोन्हीही घडले. इतर आर्य भाषा प्रमाणेच मराठीच्या वेगळेपणाची जाणीव इ.स. १००० च्या आसपास होऊ लागते. मराठी भाषेच्या बाबतीत खालील कालखंड पडतात.

### अ] प्राचीन कालखंड :-

१] कोरीव लेखातून दिसणारे मराठीचे प्राचीन स्वरूप.

२] यादव कालीन, मुसलमान कालीन, महानुभाव, ज्ञानेश्वरी आणि समकालीन असणारे उत्तर प्राचीन स्वरूप.

### ब] मध्य कालखंड

१] शिवपूर्वकाळ, मुसलमानी भाषांचा वाढता प्रभाव.

२] शिवकाळ : फार्सी वर्चस्वाची परिसीमा.

३] शिवोत्तर काळ ऐतिहासिक कागदपत्रे, बखरी, लोकवाङ्मय.

क] आर्वाचीन कालखंड :

१] अव्वल इंग्रजी काळ:-

मराठीचा नवा अवतार, व्याकरण, पाठ्यपुस्तके, शब्दकोश यांचा काळ.

२] प्रबोधन काळ:-

साहित्य, वैचारिक वाड•मय इत्यादी मधून दिसणारे मराठीचे प्रचलित स्वरूप.

२] मराठीच्या पोटभाषाव बोलीभाषा :-

१९६१ च्या जनगणनेनुसार एकंदर मराठी भाषिकांची संख्या ३,३२,८६,७७१ . इतकी होती. त्यातील ३ कोटी ३ लाख महाराष्ट्रात असून बाकी भारतातील इतर राज्यातील रहिवासी आहेत.

मराठी भाषेत किनारपट्टीवरील 'सागरी' किंवा 'कोकणी-मराठी', घाटाच्या पूर्वेला लागून 'देशी', उत्तरेकडील 'खानदेशी', पूर्वेकडील 'व-हाडी' आणि साधारणतः मध्यवर्ती अशी मराठवाड्यातील 'दक्षिणी' असे भेद नजरेत भरतात. पुण्या-मुंबईकडची मराठी ती प्रमाण मराठी म्हणण्याचा प्रघात आहे.३

प्रमाण भाषेचे स्वरूप द्विवीध असते. लिखित म्हणजे ग्रांथिक व सभासंमेलनातले म्हणजे बोलण्यातले शिष्ट. लिखित रूप परंपरानिष्ट असते आणि आता ते गंभीर लेखनापुरतेच मर्यादित राहिले आहे. तर बोलीरूप प्रसंगानुरूप बदलत असते. शिवाय नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर इत्यादी महत्वाच्या केंद्रातील भाषाही आता प्रमाण भाषेसंबंधी बोलले पाहिजे.

३] मराठी भाषेचे लेखन :-

मराठी भाषा लेखनाची देवनागरी ही लिपी आहे. मराठी भाषालेखनात लिंगवचनाला महत्व आहे. नामांचा वापर लिंगवचनानुसार केला जातो. तसाच विशेषणाबाबतही केला जातो.

मराठी भाषेत शब्दांना कार्यानुसार रूप देण्यात येते. मराठी ही विकारक्षम भाषा आहे. वाक्यातील शब्दांचा क्रम ठरवून दिलेला आहे. एखादेवेळी हेतूपूर्वक किंवा परिणाम साधण्यासाठी हा क्रम काही

प्रमाणात बदलता येतो. जसे, 'तू केव्हा आलास ?' ऐवजी 'आलास केव्हा तू ?'

४] मराठी भाषेचा शब्दसंग्रह :-

संस्कार, विधी, मुहूर्त इत्यादी कारणांनी धार्मिक वाङ्मयाशी मराठी समाजाचा सतत संबंध येत राहिला. त्यामुळे संस्कृत आवश्यक शब्दांचा परिचय कायम राहिला. ध्वनिपरिवर्तन होऊन शब्दांची जी नवी प्राकृतरूपे आली; त्याबरोबरच ही संस्कृत रूपेही अनेक क्षेत्रात चालू राहिली.

मराठीवर निरनिराळ्या लोकांच्या आक्रमणाचा परिणाम घडून येत राहिला. मुसलमानांच्या सत्तालालसेमुळे तुर्की, अरबी, फार्सी यांचा प्रभाव पडला. राज्यकारभार, सैन्यव्यवस्था, पोषाख, राजदरबार पत्रव्यवहार यामुळे मराठीत नवीननवीन शब्द आले व पुढे रूढ झाले. इंग्रजांच्या बरेच दिवस राहण्याने तर मराठीत अनेक इंग्रजी शब्द आले. तसेच फ्रेंच व पोर्तुगीज भाषेतील बरेच शब्द मराठीत रूढ झाले. आपली राष्ट्रभाषा हिंदी असल्याने हिंदीतीलही बरेच शब्द मराठीत येत आहेत. हिंदी चित्रपटामुळेही मराठीत हिंदी शब्दांचा सतत भरणा होत आहे.

घ] मराठी भाषेचे माध्यमिक शाळेतील स्थान :-

१] मराठी भाषेचे महत्व :-

जीवनमूल्यांचा संस्कार भाषेच्याच माध्यमातून होत असतो. भाषेच्या या साहित्य माध्यमातून बोलण्यात आणि लिहिण्यात परिपक्वता येते व त्यामुळे व्यक्तिमत्वाच्या जडण घडणीस मदत होते. मानवी जीवनाची व्यापकता आणि अंतःकरणाची गहनता विद्यार्थ्यांना समजून घेता येते. ज्ञानाबरोबर चिंतनशिलता विकसीत होते. आणि जीवनानुभूतीला उपयुक्त ठरते.

मानसशास्त्रज्ञाच्या मते माणूस भाषेच्या अभावी विचार करू शकत नाही.

विचार करणे म्हणजे मनोमय बोलणेच. शब्द हे वस्तूंचे किंवा कल्पनांचे प्रतिक असतात व या शब्दाच्या साहयानेच मनुष्य अमूर्त पातळीवर विचार करू शकतो. मुलाच्या मानसीक विकास प्रक्रियेत संबोध निर्मीती व भाषिक कौशल्ये यांचा विकास होत असतो.

श्री थॉमसन यांनी **'Child Psychology'** या ग्रंथात खालील प्रमाणे आपले मत मांडले आहे.

**"Conceptualization and language skils go hand in hand." 4**

भाषा प्रभुत्व, शब्दसंपदा हा बुध्दीमधील एक प्रमुख घटक मानला जातो. ज्यांची शब्दशक्ती अधिक त्यांची बुध्दीमत्ता श्रेष्ठ असते. असे मानसशास्त्रज्ञांचे मत आहे.

व्यवहारातून व अनुकरणातून मूल भाषा शिकू लागते. जीवनाच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी भाषाज्ञान आवश्यक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात खरे जीवन जगायचे असेल, ज्ञान प्राप्त करून घ्यायचे असेल तर भाषेचा सुव्यवस्थित अभ्यास आवश्यक आहे. भाषेच्या अभ्यासानेच व्यक्तीत्वाचा सर्वांगीण विकास करणे शक्य होईल.

श्रवण व भाषण कौशल्यांचा विकास नैसर्गिकपणे होत असला तरी लेखन-वाचन शिकावेच लागते. इतरांचे विचार नीट समजून घेण्याची पात्रता, प्रसंगोचीत भाषेचा कुशलतेने वापर करण्याचे कौशल्य भाषेच्या प्रयत्नपूर्वक व नियोजन बध्द अभ्यासाशिवाय अशक्य आहे. शिवाय भाषा हा केवळ एक विषय नाही तर भाषा शिक्षणाचे माध्यम आहे. अध्ययन अध्यापनाचे भाषा हे माध्यम आहे.

शिक्षण, अध्ययन, अध्यापन, अभ्यास ह्या गोष्टी भाषेशिवाय परिपूर्ण होणार नाहीत. मातृभाषेला तर अध्ययन - अध्यापनात खूप महत्त्व आहे. प्राथमिक स्तरावर मातृभाषेशिवाय शिक्षण होऊ शकणार नाही. माध्यमिक स्तरावर व उच्च शिक्षणासाठी मातृभाषेचा उपयोग करण्याने ज्ञानप्राप्ती सुलभतेने घडून येते. परभाषेतून ज्ञानप्राप्ती उशीरा होते. परभाषा शिकण्यासाठी शक्तीचा व्यय होतो. तीच शक्ती ज्ञान मिळविण्यासाठी उपयोगात आणली तर लवकर ज्ञान प्राप्ती होते. म्हणून मातृभाषेतून शिक्षण देणे हे गरजेचे व उपयुक्त आहे.

महाविद्यालयीन अभ्यासासाठी विज्ञान व शाखेत इंग्रजीचा माध्यम म्हणून अवलंब केला जात असल्याने विषयसंपादनास उशीर होतो. पुण्याच्या माध्यमिक

शिक्षण मंडळाने माध्यमिक शिक्षणात विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमासाठी मराठी माध्यम घेतलेल्या व इंग्रजी माध्यम घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळातील विज्ञान विषयातील प्रगतीचा तौलनिक आढावा घेतला असून त्यात माध्यमिक शाळांमध्ये ज्यानी विज्ञानशाखेच्या अभ्यासासाठी मराठी माध्यम घेतले होते. त्यानी इंग्रजी माध्यम घेतलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक प्रगती केल्याचे दिसून आले. विषयाची पूर्ण कल्पना, विषयज्ञानाची व्याप्ती, त्याचे कौशल्य मातृभाषेच्या माध्यमातूनच सहजपणे घडून येते.

मातृभाषा हे शिक्षणाचे, ज्ञानप्राप्तीचे माध्यम आहे. ज्या त्या विषयाची गोडी मातृभाषेच्या माध्यमामुळे निर्माण होऊ शकते. मातृभाषे-मुळेच विषयाची गोडी वाढते, रसीकता वाढते, सृजनशीलता वाढते, विषयाची स्पष्ट कल्पना, विषयज्ञानाची व्याप्ती, परिपुष्टता व परिपक्वता ही मातृभाषेच्या माध्यमातूनच सुलभपणे प्राप्त होऊ शकते. विषय कोणताही असो विषयाच्या अभ्यासाची तयारी, पार्श्वभूमी, वैचारिक बैठक जर व्यवस्थित झाली, विषयाच्या पुढील अभ्यासासाठी आवश्यक असलेली आकलनशक्ती व कौशल्ये यांचा पूरेसा विकास झाला तर पुढे विद्यार्थी अन्य भाषेतूनही त्या विषयाचा अभ्यास चांगल्याप्रकारे करु शकतात. आपल्या देशातील इतर प्रादेशीक भाषांचाही परिचय असणे हिताचे आहे. परंतु प्रत्येकाला हे शक्य नाही. बहुसंख्य लोकांचा भर मातृभाषेवरच आसतो. बहुसंख्य विद्वान मातृभाषेतीलच ग्रंथ वाचतात. भाषण लेखनासाठी मातृभाषेचीच निवड करतात. तात्पर्य विद्यार्थ्यांच्या वा कोणत्याही व्यक्तीच्या संपूर्ण शैक्षणिक विकासाचे माध्यम मातृभाषा ! म्हणूनच कोलरीज म्हणतो,

**"Mothertongue is the language of heart."** 5

२] <u>मराठी विषयाचा माध्यमिक शाळेतील अध्यापनाचा अर्थ व स्वरुप :-</u>

अध्यापन प्रक्रिया :-

आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांच्या मते शिक्षण म्हणजे विकास, सर्वांगीण विकास । अध्यापन ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे. केवळ माहिती देणे किंवा ज्ञान-संवर्धन करणे म्हणजे अध्यापन नव्हे. तर विद्यार्थ्यांच्या अनेकविध मानसिक शक्ती

व प्रवृत्ती जागृत करणे. त्यांना चालना देणे व त्यांचा विकास घडवून आणून प्रत्येक विद्यार्थ्यांमधून एक बुध्दिमान, कार्यक्षम व सुसंस्कृत व्यक्तीमत्त्व निर्माण करणे हे खरे अध्यापन.।

डिक्शनरी ऑफ एज्युकेशन या ग्रंथात अध्यापनाच्या पुढील व्याख्या दिलेल्या आहेत.

" बालक अथवा प्रौढ विद्यार्थ्याला एखाद्या शैक्षणिक संस्थेत पढविणे".

औपचारिकरित्या अथवा अनौपचारिकरित्या अध्ययन उपक्रमात सहभागी असणा-यांना अध्ययनास सहाय्यभूत होणारे प्रसंग, परिस्थिती अथवा कार्यक्रम उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया" [६]

मानव बाल्यावस्थेत आपल्या आई-वडिलाकडून ब-याच गोष्टी शिकत असतो. स्वत:चे रक्षण, शरीरसंवर्धन याबाबतचे कौशल्य संपादन करत असतो. निरीक्षण व अनुकरणातून बालक अनेक कौशल्ये संपादन करते. जीवन विकासातून संस्कृतीचा विकास यांचा शिक्षणात समावेश झाला. संस्कारक्षम कला व ज्ञान आणि कौशल्ये यांचाही शिक्षणात समावेश झाला. त्याबरोबरच अध्यापन म्हणजे नुसते पढविणे हे विधान टाकाऊ ठरले. शिकणे व शिकविणे यावरच अध्ययन अध्यापन क्रीया संपत नाहीत तर शिक्षकाने किती शिकविले यापेक्षा विद्यार्थी किती शिकला याला अधिक महत्त्व आहे.

विद्यार्थ्यांच्या डोक्यात खच्चून ज्ञान भरणे म्हणजे शिकविणे असे पूर्वी मानत. विद्यार्थ्यांचा बौध्दिक, भावनिक व क्रियात्मक विकास घडवून आणणे म्हणजे अध्यापन होय. अशा अध्यापनक्रियेतून विद्यार्थ्यांचा भावी काल सुखमय होण्यास मदत होते. जीवन यथार्थ होते. शिक्षण शास्त्रज्ञ अल्फ्रेड व्हाईटहेडचे या संदर्भातील बोल महत्त्वाचे ठरतात.

**'I have been much struck by the paralysis of thought inducted in puplil by the aimless accumulation of precise knowledge inert and unutilised." 7**

माहितीचे ज्ञानात रुपांतर होण्यासाठी तिच्यात विविध बौध्दिक, भावनिक व स्थायिक कृतींचे व अनुभवाचे रसायन मिसळावे लागते. असे झाल्यास माहिती

अचेतन [Inert ] आणि गंजलेली [ unutilized] रहातच नाही. व्हाईटहेड जेकेटॉट यांचा अध्यापनविषयक दृष्टीकोण अतिशय महत्वाचा वाटतो. याच्या आधारेच शिक्षकाने आपली कर्तव्य जबाबदारी ओळखणे जरूरीचे आहे. ज्ञानात्मक विकासाबरोबर भावात्मक व क्रियात्मक विकास घडवून आणण्याचे कार्य अध्यापनाव्दारे शिक्षकाने करावयाचे आहे.

आधुनिक काळात वरचेवर विज्ञानदृष्टी वाढत आहे. त्यामुळे शिक्षणातही बदल घडून येणे अपरिहार्यच झाले आहे. शिक्षण म्हणजे बदल, विकास. त्यामुळे शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. असा विचार पुढे येत आहे. शिक्षक विद्यार्थ्याला जीवनभर पुरणार नाही. परंतु शिक्षकाने नव्या आव्हानांना पेलण्याचे सामर्थ्य व कौशल्य विद्यार्थ्यांना दिलेले असते ते जन्मभर पुरते. म्हणजेच शिक्षकाने किती दिले ? यापेक्षा विद्यार्थ्यानि किती घेतले ? याला महत्व आहे.

३] मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील शिक्षण :-

अनौपचारिक रितीने लहान मूल स्वभाषा शिकत असते. लहान मूल हे अनुकरणप्रीय असते. घरातील माता-पित्याकडून, भाऊ-बहिणीकडून अनेक शब्द व त्यांचे उच्चार ते हस्तगत करते. बोबडे बोल बोलू लागते. स्वतःची गरज वाढल्यास अनेक नवीन नवीन शब्द मूल शिकते. प्राथमिक स्तरावर औपचारिक पध्दतीने स्वभाषेचे ज्ञान दिले जाते. सध्या प्राथमिक स्तरावर सर्वत्र मातृभाषेतूनच शिक्षण दिले जात आहे. बोली भाषा व प्रमाणभाषा यांचा संबंध प्राथमिक स्तरावर मुलांच्या समोर येत असतो. बोलीभाषे ऐवजी शालेय प्रमाणभाषा शिकविण्याची जबाबदारी प्राथमिक शिक्षकांची आहे. प्राथमिक स्तरांतील मुलांमध्ये प्रमाणभाषा रूजणे अतिशय महत्वाचे असते. प्रमाण भाषेतून बोलणे, लिहिणे या क्रिया प्राथमिक शिक्षकांनी मुलाकडून उत्तम रितीने करून घेणे महत्वाचे आहे.

प्राथमिक शिक्षणाने मुलामध्ये स्वभाषा शिक्षण नीट रूजले तर माध्यमिक शाळेत स्वभाषा शिक्षणाचे हेतू साध्य होण्यास मदत होते.

शुध्द व स्पष्ट बोलणे, आपले विचार, आपल्या भावना सुव्यवस्थित व मुद्देसूद स्वरूपात प्रकट करणे, आपले मत इतरांना पटवून देणे, आकर्षक व परिणामकारक बोलण्याच्या पध्दतीमुळे इतरांवर प्रभाव टाकणे इत्यादी गोष्टी माध्यमिक

स्तरावर मुलांना जमणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा समतोल विकास घडविला पाहिजे. फक्त लेखी परीक्षांवर भर दिल्याने वरील सर्व गोष्टी साध्य होत नाहीत.

श्रवण, भाषण, वाचन व लेखन हा भाषाशिक्षणाचा नैसर्गिक क्रम होय. असा क्रमबध्द विकास अध्यापनाव्दारे साध्य करावयास पाहिजे. 'भाषण' हे श्रवणावर अवलंबून आहे. शिक्षक जे काही सांगतात ते नीट ऐकणे, समजणे, त्यातील मुद्दे, आशय नीट लक्षात घेणे हे आवश्यक आहे. श्रवणाकलन क्षमता विकसीत झाली तर पुढे महाविद्यालयीन शिक्षणात प्राध्यापकांच्या भाषणातील आशय नीट समजून घेणे विद्यार्थ्याला जमेल. लेखनाच्या आधी विद्यार्थ्याला भरपूर वाचन करावयास लावणे महत्त्वाचे आहे. भाषाविकासात श्रवणाकलनाचे जसे महत्त्व आहे तसेच वाचनाकलनाचे ही आहे वाचनाव्दारेच विद्यार्थ्यांचा वैचारिक विकास होतो. त्याबरोबरच ज्ञानविकासही होतो. माध्यमिक शिक्षकाने अशी लेखनाची पूर्वतयारी करुन घ्यावी.

भाषा शिकण्याची नैसर्गिक शक्ती मानवी प्राण्याला लाभली आहे. माध्यमिक शाळांमध्ये मुलांना आत्मसात झालेल्या भाषेच्या आधाराने भाषा या गोष्टीबद्दलचे कुतूहल जागविणे आणि शमविणे. उदाहरणार्थ, लेखन व वाचन यातील फरक, वेगवेगळ्या मोडणीची वाक्ये, त्यांची तुलना, संदर्भानुसार शब्द, वाक्ये यांचे अर्थ बदलणे या गोष्टीकडे लक्ष वेधल्यास विद्यार्थ्यांचा भाषेबद्दलचा आत्मविश्वास वाढेल. स्वभाषेतील नव्या, जुन्या ललित-ललितेतर वाङ्मयाचा वारसा विद्यार्थ्यापर्यंत पोचावा. यासाठी माध्यमिक स्तरावर त्यांना रसिकतेने व विचारपूर्वक वाचायचे कसे याची जाण शिक्षकाने द्यावयास पाहिजे. ज्ञानग्रहण करण्यासाठी भाषेचा उपयोग कसा करावा याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी. उदाहरणार्थ, वाचताना टिपणे काढणे, चर्चा करणे, निबंध लिहिणे याचा सराव करतांना शब्दांचा वापर कोठे, कसा करावा याची जाणीव होणे; असे झाले तरच महाविद्यालयीन शिक्षणाचा पाया योग्यरितीने भरला जाईल.

मातृभाषा आत्मसात करताना विद्यार्थ्यांच्या अंगच्या सर्वसामान्य इतर भाषाध्ययन शक्तीचाही विकास घडून येत असतो. मातृभाषेप्रमाणेच इतर भाषेबाबतीत त्याची गोडी वाढत असते. इतर कोणतीही भाषा शिकण्यासाठी आवश्यक असलेली संवेदनक्षमता, शारीरिक व मानसिक तयारी त्याच्यात निर्माण होत असते. यालाच नवीन भाषा शिकण्याची पूर्वतयारी म्हणतात.

श्री. पी.गरे यानी आपल्या 'Teaching the mother tongue in secondary School' या पुस्तकात म्हटले आहे.

"It is a training of pupils language abilities, so that they can make more use of the language they already know" 8

मातृभाषेबाबतच्या अध्यापकांनी विद्यार्थ्यांना मातृभाषेचे ज्ञान देत असताना त्याना केवळ मातृभाषेतच तरबेज करण्याचा संकुचित दृष्टीकोन न ठेवता नवभाषा, परभाषा शिकण्यासाठी आवश्यक अशी त्यांची पूर्व तयारी करण्याचीही जबाबदारी माध्यमिक शिक्षकावर आहे. मातृभाषेवरील प्रभुत्व हा अन्य भाषांच्या अध्ययनाचा पाया होय. हे ओळखून मातृभाषेचे अध्यापन काळजीपूर्वक, पध्दतशीर, तंत्रशुध्द व शास्त्रशुध्द होईल याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.

मराठी विषयाला असणारे हे महत्व ओळखून माध्यमिक अभ्यासक्रमात या विषयाला खूप महत्व दिले आहे. माध्यमिक स्तरावर मराठी विषय सक्तीचा व १०० गुणांचा आहे. वेळापत्रकात या विषयाला आठवडयात ७ तासिका देऊन त्या विषयाला अभ्यासक्रमात योग्य स्थान दिले.

३] मराठी विषयाच्या अध्ययनाची तत्वे :-

मुलांच्या मातृभाषा अध्ययनाची सुरुवात कुटुंबात व समाजात झालेली असते. बाल्यवस्थेतील शिक्षणाला म्हणजेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षणातील मातृभाषेच्या अध्ययन प्रक्रियेची खालील मूलतत्वे निश्चितच मार्गदर्शक ठरु शकतात.

१] पुनरावृत्ती:-

कोणतीही गोष्ट अंगी बाणवण्यासाठी पुनरावृत्ती आवश्यक आहे. नवनवीन शब्दांच्या वाक्यात, लेखनात उपयोग, नवीन वाक्प्रचारांचा लेखनात उपयोग हे पुनरावृत्तीमुळेच मनावर ठसते. शुध्द उच्चार पुनरावृत्तीमुळेच मनावर ठसतात. शुध्द उच्चार पुनरावृत्तीशिवाय जमणार नाहीत. उच्चारलय, हेल काढून बोलणे, विशिष्ट शब्दावर जोर देवून बोलणे, निरनिराळ्या प्रादेशिक शब्दांचा उच्चार पुनरावृत्तीमुळे शक्य होतील. भाषाविषयक चांगल्या सवयी लावण्यासाठी पुनरावृत्तीचा उपयोग करुन घेणे आवश्यक ठरते. जोडाक्षरांचे स्पष्ट उच्चार, शुध्द वाक्य रचना, हस्ताक्षर, शुध्दलेखन इत्यादी प्राथमिक कौशल्ये पुनरावृत्तीमुळेच दृढ होऊ शकतात. नम्रतेने बोलणे, नाट्यपूर्ण व भावपूर्ण वाचन, वक्तृत्वकला या गोष्टी जोपासण्यासाठी

निरंतर अभ्यास व प्रयत्न याची आवश्यकता आहे.

पुनरावृत्ती करून घेत असताना सूचना लक्षात घ्याव्यात. पुनरावृत्तीत सातत्य असावे. एखादी गोष्ट आत्मसात होई पर्यंत सतत वारंवार पुनरावृत्ती व्हावयास पाहिजे. पुनरावृत्तीत जास्त खंड पडू देऊ नये. शिवाय पुनरावृत्ती बिनचूक, निर्दोष अशीच असावी. चुकीच्या अनुकरणातून भाषाव्यवहारात अनेक चुका घडतात. चांगल्या व योग्य सवयीसाठी पुनरावृत्ती आवश्यक आहे. अयोग्य संस्कारापासून मुलांना दूर ठेवणे हितावह असते.

२] प्रारंभ:-

बालकाच्या वयाचा ६ ते १० हा काळ भाषिक कौशल्ये आत्मसात करण्याच्या दृष्टीने अधिक परिणामकारक असतो. या वयात मुलांची इंद्रिये अधिक लवचिक व संस्कारक्षम असतात. ६ वर्षे वयाचे मूल भाषिक दृष्टया प्रौढ बनलेले असते. याविषयी सी. एफ्. हॉकेट म्हणतात,

> " By the age of four to six, the normal child is a linguistic adulalt. He cntrols with marginal exceptions if any, the phonemic system of the language,. He handles effortlessly the grammatical core, he knows and uses the bacis contentive vocabulary of the language" 9.

६ ते १० वर्षे वयाच्या कालखंडात मुलाच्या उच्चारामधील दोष घालवून निर्दोष उच्चार स्ळविणे, बोलण्याच्या सुयोग्य सवयी लावणे, हस्ताक्षरांना योग्य वळण देणे. पाठांतरांची सवय दृढ करणे या गोष्टी सुलभतेने साध्य होऊ शकतात.

३] परिपक्वता:-

कोणतीही नवीन गोष्ट साध्य करण्याची शारीरिक व मानसिक क्षमता आवश्यक असते. भाषा कौशल्य संपादनासाठीही हीच पात्रता आवश्यक असते. विद्यार्थ्यांचे अनुभव क्षेत्र किंवा आकलनशक्तीच्या टप्प्या बाहेरील शब्द शिक्षकांनी दिल्यास त्याचा काही उपयोग होणार नाही. मुलांच्या वयाला अनुरूप, आकलनशक्तीला अनुरूप असेच भाषेचे नवीन पाठ शिक्षकांनी द्यावेत. विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी लक्षात घेऊन तात्त्विक निबंधाचे विषय द्यावेत. काही मुलांच्या वागिंद्रियात व्यंग असते. ती विकृत्ती दूर झाल्याशिवाय मुलांचे उच्चार सुधारत नाहीत.

काही मुलांची बौध्दिक पातळी कमी प्रतीची असते. ते ओळखून शिक्षकाने नवीन संबोध त्यांना द्यावेत. म्हणजे विद्यार्थ्यांना भाषा शिकविताना त्यांच्या वयाचा, आवडी-निवडींचा, आकलन शक्तीचा, शारीरीक, बौध्दिक व मानसिक परिपक्वतेचा विचार करावा.

४] प्रवर्तन :-

शिकण्याच्या क्रियेला मिळणारी चालना व गती यासच प्रवर्तन म्हणतात. प्रवर्तनाशिवाय शिकणे शक्य नाही. भाषेचे अध्यापन करताना विविध प्रकारच्या प्रवर्तकांचा उपयोग केल्यास मुले भाषा शिकण्याला उत्सुक बनतात. योग्य उच्चार स्पर्धा ठेवणे, हस्ताक्षर स्पर्धा ठेवणे, वक्तृत्वस्पर्धा ठेवणे. काव्यगायन स्पर्धा ठेवणे, भाषिक खेळांची योजना करणे, कथाकथन स्पर्धा ठेवणे इत्यादी गोष्टीमुळे अनुक्रमे उच्चार, वळणदार अक्षर , सभेत बोलणे, काव्य चालीवर म्हणणे, आपले म्हणणे इतरांपुढे नीट मांडणे ही भाषिक कौशल्ये वाढीस लागतील.

५] उपयोजन :-

शाळेत भाषेच्या तासाला बरेच नवीन शब्द मुले शिकतात. नवीन नवीन वाक्प्रचार शिकतात. ह्या नवीन शब्दांचा, वाक्प्रचारांचा व्यवहारात बोलताना, कुटुंबात, समाजात वावरताना मुलांनी उपयोग करणे यासच उपयोजन म्हणतात. वाक्प्रचारांचा अर्थ लक्षात येतो परंतु वाक्यात उपयोग करणे जमत नाही. यासाठी भाषेचा उपयोग करण्यासाठी अधिकाधिक संधी मुलांना द्यावयास हवी. प्रत्येक भाषिक व्यवहारामध्ये मुलांना सक्रियतेने सहभागी करून घेतले पाहिजे.

६] परिस्थिती :-

भाषा व परिस्थितीचा संबंध स्पष्ट करताना एफ्. एल्. बिल्लोज आपल्या 'The Teehniques of language Teaching' या ग्रंथात म्हणतात,

> "They must experience laguage, live in it not merely understand it, every movement, every process, every wish, every need must be introduced by words, accompanied by words, commented on in words, followed by words and dismissed by words---- the material of the language lesson is not languge, but life Itself- - - " 9

या दृष्टीने भाषेच्या अध्यापनाचा व विद्यार्थ्यांच्या जीवनाचा संबंध जोडला पाहिजे.

नुसत्या पुस्तकावर भर देऊन भाषा शिक्षण अपूरेच राहिल. खरे पाहिले असता मुले भाषा जगली पाहिजेत. भाषेचा आणि जीवनाचा संबंध जोडला गेला पाहिजे. मुले ज्या समाजात वावरतात, त्या समाजाच्या गरजा, त्या समाजाचे प्रश्न, त्या समाजाच्या आशा-आकांक्षा इत्यादी सर्व गोष्टी भाषेच्या माध्यमातून प्रगट झाल्या पाहिजेत. जीवनातून भाषा शिकविण्याचा व जीवन व्यवहारात तिचा उपयोग कसा करावा हे शिकविण्याचा प्रयत्न शिक्षकाने भाषा अध्यापनाद्वारे केला पाहिजे.

७] पर्यावरण :-

कुटुंब, सामाजिक परीसर व शाळा या तीन घटकांचा समावेश पर्यावरणात होत असतो. या तीन घटकांचा परिणाम मुलांच्या भाषिक कौशल्यावर होत राहतो. कुटुंबातील भाषा जशी, तशीच मुलांचीही भाषा असते. कौटुंबिक वातावरणात पालकांचा सहभाग असेल तर भाषिक कौशल्य वाढीस लागते. अशिक्षित व झोपडपट्टीत राहणा-या कुटुंबातील मुलांच्या भाषिक विकासावर या परिस्थितीचा परिणाम होतो. गरीब कुटुंबातील मुलांचे अनुभवविश्व मर्यादीत असते. श्रीमंत, सुसंस्कृत कुटुंबातील मुलांना सर्व सोयी उपलब्ध असतात. साधने विपुल असतात. त्यामुळे त्यांचा भाषा विकास घडून येतो. यासाठी शिक्षकाने पालकवर्ग बोलवून त्यानाही मार्गदर्शन करावयास हवे.

मुलांचा शेजारी सुसंस्कृत असेल, मित्रमंडळ चांगले असेल तर भाषेचे संस्कारही योग्य तेच होतात. मुलांचे नेहमीचे व्यवहार ज्यांच्याशी होत असतात त्यांच्याप्रमाणेच भाषिक संस्कार घडून येतात.

शालेय वातावरणात भाषा विषयक योग्य सवयी जडविल्या गेल्या पाहिजेत. जर शिक्षकांचेच बोलणे अशुध्द असेल तर मुलेही तसेच बोलतात. शिक्षकांचे भाषा प्रभुत्व, भाषा अध्यापनातील त्यांची तळमळ, प्रयत्न, अवांतर वाचनाचे तास, भाषिक कौशल्य वाढीबाबतच्या सर्व स्पर्धा इत्यादी गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या भाषा विकासावर परिणाम होत असतो. अशुध्द बोलणा-या विद्यार्थ्यांना शुध्द बोलणा-या विद्यार्थ्यांच्या गटात बसविल्यास अशुध्द बोलणे कमी कमी होत जाईल.

८] समतोल व क्रमबध्द विकास :-

श्रवण, भाषण, वाचन व लेखन हा भाषा शिक्षणाचा क्रम आहे. परंतु परीक्षा लिखीत स्वरूपाची असते. म्हणून शाळेत लेखन विकासावरच अधिक भर दिला जातो. त्यामुळे लेखी परीक्षेत जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी भाषण कौशल्यात मागे पडतात.

विद्यार्थ्यांना व्यावहारीक जीवनात यशस्वी होण्यासाठी, आपले जीवन सफल बनविण्यासाठी भाषाशिक्षणाचा उपयोग होतो. म्हणूनच शिक्षकाने अध्यापनकार्यात विद्यार्थ्यांमधील सर्व कौशल्यांचा समतोल विकास साधावयाचा असतो.

भाषणहे श्रवणावर अवलंबून असते. लेखन हे वाचनावर आवलंबून असते. या गोष्टी शिक्षकाने ध्यानात घ्याव्यात. म्हणजे विद्यार्थ्यांचा क्रमबध विकास साधावयास पाहिजे. याबाबत एफ्. एल्. बिल्लोज आपल्या 'Techniques of Language'या ग्रंथात म्हणतात.

> " To speak a language with confidence, learners must have an opportunity of hearing languge spoken correctly and fluently in a significant way so that their minds can move repidly in the language without reflection on the individual words or their positions in the sentence," 11

श्रवणाकलन क्षमतेने व वाचनाकलनक्षमतेचे भाषाविकासात महत्वाचे स्थान आहे. माध्यमिक स्तरावर शिक्षकांनी सांगितलेले नीट ऐकणे, लक्षात घेणे शक्य झाले तरच विधार्थी महाविधालयीन स्तरावर प्राध्यापकांची व्याख्याने नीट ऐकू शकतील.

९] नवनिर्मितीवर भर:-

हॅलिडे, मॅकिन्टॉश व स्टीव्हन्स या भाषाशास्त्रांनी मातृभाषेच्या अध्यपन प्रक्रियेचे विवेचन करताना तीन प्रकारच्या दृष्टिकोणांचा उल्लेख केला आहे.

१] नवीन भाषिक कौशल्ये शिकविणे, नवे शब्द, नव्या म्हणी, नवे वाक्प्रचार, नवी वाक्यरचना, भाषेच्या वर्तनाची नवनवीन वैशिष्टये शिकविणे.

२] भाषेचा वापर करीत असताना मुले कोणकोणत्या चुका करतात ते पाहून त्याना चुकांची सतत दुरुस्ती करावयास लावणे यालाच भाषा सुधार दृष्टिकाण म्हणतात.

३] भाषा शिकताना मुलांच्या ज्या चुका होतात त्या चुका कशामुळे घडतात ते मुलांना सांगणे शिवाय भाषावर्तन प्रकारांचे स्पष्टीकरण शिक्षकाने करणे.

भाषा शिकविणे म्हणजे एक प्रकारची सवय लावणे होय. जुन्या व चुकीच्या सवयी संपवून नव्या व योग्य अशा सवयी लावाव्यात. नवनवीन प्रकारची भाषिक कौशल्ये व भाषिक वर्तने जर मुलांनी आत्मसात केली तर त्यांच्या भाषा व्यवहारातील चुका व उणिवा आपोआपच दूर होत जातील.


भाषेचे अध्यापन करताना शिक्षकानी हाही दृष्टिकोन लक्षात घेऊन अमलात आणावा.

## २.२ मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे:-

### क] माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाची भाषिक उद्दिष्टे:-

अध्यापनातून विद्यार्थ्यांच्याविविध मन:शक्तींचा व मन:प्रवृत्तींचा विकास घडवून आणणे हे शिक्षकाचे काम आहे. प्रत्येक विषयाची काही वैशिष्टये असतात, तसेच काही मर्यादाही असतात. प्रत्येक विषयाच्या अध्यापनाचा विचार विकासात्मक पातळीवरच केला पाहिजे.

मराठीच्या अध्यापनात सध्या नेमलेले पाठ्यपुस्तक शिकविणे, ठराविक अभ्यासक्रम पूर्ण करणे व परीक्षेच्या दृष्टीने विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे याच मर्यादित दृष्टिकोणातून बहुसंख्य शिक्षक अध्यापन करतात. याचा अर्थ शिक्षक मराठी पुस्तक शिकवतात, पण मराठी विषय शिकवत नाहीत, असा होतो. मराठीच्या अध्यापनात विद्यार्थ्यांच्या कोणकोणत्या मानसिक शक्तींचा वृत्तीप्रवृत्तींचा व कौशल्यांचा विकास होऊ शकतो हे शिक्षकांनी लक्षात घेऊन उद्दिष्टे निश्चित करावी लागतात. अध्यापन हे उद्दिष्टानुगामीअसायला पाहिजे. म.बा. कुंडले यानी 'मराठीचे अध्यापन' या ग्रंथात मराठीच्या अध्यापनाची खालील उद्दिष्टे दिली आहेत.



भाषिक उद्दिष्टे:-

भाषा समजणे [ भाषा ग्रहणशक्ती ]व भाषेचा वापर करता येणे [भाषा प्रकटीकरणशक्ती] ही भाषेची दोन प्रमुख कार्ये आहेत. भाषा ग्रहण शक्ती मध्ये ऐकलेली भाषा समजणे म्हणजे"श्रवण"व लिहिलेली भाषा समजणे म्हणजे "वाचन" ही दोन कौशल्ये अंतर्भूत होतात. तसेच भाषा प्रकटीकरण शक्तीमध्ये भाषा बोलणे म्हणजे "भाषण" व भाषा लिहीणे म्हणजे "लेखन" या दोन मुलभूत कौशल्यांचा समावेश होतो.

दैनंदिन जीवनात, व्यवहारात, शिक्षणात इतरांचे अनुभव व विचार भावना ग्रहण करण्यास, त्याच प्रमाणे हरत-हेच्याआत्मप्रकटीकरणास आवश्यक असलेले भाषीक सामर्थ्य प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे यालाच भाषिक उद्दिष्टे म्हणतात.

१] ग्रहणात्मक उद्दिष्टे:-

विद्यार्थ्यांना शब्दांचे अर्थ, शब्दांच्या मागील सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी समजणे. दुसऱ्यांचे बोलणे समजणे. दुसऱ्यांचे लिखाण समजणे. त्यातील मध्यवर्ती कल्पना, प्रमुख मुददा जाणणे. त्यातील आशय लक्षात घेणे. गार्भितार्थ कळणे. विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला, कल्पनाशक्तीला व बुध्दीला चालना देणे म्हणजेच ग्रहणात्मक उद्दिष्टे साध्य करणे होय.

२] प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे:-

स्वत:चे विचार, भावना, अनुभूती प्रकट करणे. मौखिक व लेखी या दोन पातळीवर प्रगटीकरण करता येणे,शुध्दलेखन व शुध्द भाषण आवश्यक असणे, सुयोग्य रितीने आपले विचारदुसऱ्यापुढे मांडता येणे,कल्पना स्पष्टीकरण करता येणे, कल्पनाविस्तार करणे, वर्णन कौशल्य व निवेदन कौशल्य अंगी बाणणे,वाक्यरचना, परिच्छेदलेखन, निबंध लेखन, प्रश्नोत्तराचे लेखन, सारांशलेखन, पत्रलेखन इत्यादी कौशल्ये प्राप्त होणे. चर्चा, वादविवाद, कथा-कथन यामध्ये भाग घेणे हीच प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे होत.

ख] माध्यमिक शाळेतील मराठी विषय अध्यापनाची वाङ्मयीन उद्दिष्टे:-

माध्यमिक वर्गामध्ये भाषिक घटका बरोबरच वाङ्मयीन उद्दिष्टांना अध्यापनात स्थान दयावे. महाविद्यालयीन पातळीवर मात्र मराठी हा विषय प्रामुख्याने वाङ्मयीन दृष्टिकोणातून शिकविला जावा. रस, सौंदर्य, अनुभवी व कलात्मक ही वाङ्मयीन कला कृतीची मूलतत्त्वे आहेत. रस ग्रहणात्मक व सृजनात्मक हे वाङ्मयीन उद्दिष्टांचे

दोन प्रकार आहेत.

१] <u>रसग्रहणात्मक [सौंदर्यानुभूतीपर] उद्दिष्टे:-</u>

विद्यार्थ्यांना रसास्वाद घेता यावा म्हणजेच सौंदर्य स्वादाची पात्रता विद्यार्थ्यात यावी; असे शिक्षकाचे अध्यापन असावे. अध्यापनातून निरनिराळ्या मानवी भावनांशी व पात्रांशी विद्यार्थ्यांना समरस करून घ्यावे. विद्यार्थ्यात तशी सहानुभूती निर्माण करून मानवी मनाच्यागुढतेचा व सखोलतेचा प्रत्यय आणून द्यावा. विद्यार्थ्यांची संवेदन क्षमता, सौंदर्यदृष्टी, सहृदयता, सद्भिरुची, रसिकता जागृत करावी. वाङ्मयाचा अध्यापक हा कलाकृती व विद्यार्थी यांच्यात संबंध स्थापणारा महत्वाचा दुवा आहे. मराठी भाषा, साहित्य, साहित्यिक या विषयीची आदराची भावना विद्यार्थ्यात यावी.

२] <u>सृजनात्मक उद्दिष्टे:-</u>

सुंदर स्वतंत्र, शैलीदार लिखाण करण्याची स्फूर्ती विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे. भाषा सौंदर्य प्रसाधनांचा योग्य वापर करणे~~(योग्य वापर करणे)~~ योग्य शब्दांचा वापर करणे, अलंकार, सुवचने यांची सुबोध मांडणीकरणे म्हणजेच सृजनात्मक उद्दिष्ट होय. यासाठी शिक्षकाने विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे. संवाद नाटयछटा, कविता, कथा चरित्र, प्रवासवर्णन विद्यार्थ्यांनी स्वत: करावयास हवे. शाळेच्या हस्तलिखित मासिकासाठी स्वत: लेखन देणे, शालेय निबंधस्पर्धेत भाग घेणे म्हणजेच सृजनशीलता होय. यासाठी शिक्षकानी अध्यापनातून योग्य प्रयत्न करावयास हवेत.

२.३ <u>समारोप:-</u>

या प्रकरणात मराठी विषयाचे माध्यमिक शाळेतील स्थान व मराठी विषय अध्यापनाचे महत्त्व, उद्दिष्टे याविषयी माहिती दिली आहे. मराठी विषयाच्या अध्यापनपध्दतीची माहिती वाङ्मय प्रकारानुसार पुढील प्रकरण नं. ३ मध्ये दिली आहे.

## -:: संदर्भ :-


| | |
|---|---|
| १] म.बा. कुंडले | : रा.शो. सराफांची भाषेची व्याख्या उद्धृत. मराठीचे अध्यापन. पुणे, श्री विद्या प्रकाशन, १९८५ पृष्ठ क्र. १० |
| २] म.बा. कुंडले | : गं.ब. ग्रामोपाध्ये यांची भाषेची व्याख्या उद्धृत. तत्रैव. पृष्ठ क्र. १० |
| ३] लक्ष्मणशास्त्री जोशी | :- मराठी विश्वकोश, खंड १२ मुंबई, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, पृष्ठ क्र. ४४०. |
| ४] म.बा. कुंडले | :- श्री थॉमसन यांचे मत उद्धृत. उपरिनिर्दिष्ट. पृष्ठ क्र. २० |
| ५] म.बा. कुंडले | :- तत्रैव. पृष्ठ क्र. २० |
| ६] लीला पाटील | :- डिक्शनरी ऑफ एज्युकेशनमधील अध्यापनाची व्याख्या उद्धृत. आजचे अध्यापन. पुणे, श्री विद्या प्रकाशन, १९८३. पृष्ठ क्र. ४. |
| ७] लीला पाटील | :- अल्फ्रेड व्हाईट हेड यांचे अध्यापनाबाबतचे मत उद्धृत. तत्रैव. पृष्ठ क्र. ४. |
| ८] म.बा. कुंडले | :- उपरिनिर्दिष्ट, पृष्ठ क्र.४८ |
| ९] म.बा. कुंडले | :- तत्रैव, पृष्ठ क्र. ४० |
| १०] म.बा. कुंडले | :- तत्रैव, पृष्ठ क्र. ४२ |
| ११] म.बा. कुंडले | :- तत्रैव, पृष्ठ क्र. ४६ |
| १२] म.बा. कुंडले | :- तत्रैव, पृष्ट क्र. ५० |


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR